


दैनिक
# आकर्षण
संपादक : विजय सांगळे




वर्ष ६ । अंक २८ । शनिवार १७ ऑक्टोबर २०२६ । पाने ४ मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322



सोमवंशी क्षत्रिय कासार समाज,
श्री कालिका देवी, अहिल्यानगर
माळ ६ वाहन : सिंह
मूर्तीकार : श्री धनंजय वेळापुरे.
छाया : विशाल येंडे

## तरुणाला मारहाण प्रकरण

# भाजप नगरसेवक सागर मुर्तडकर यांचा अटकपूर्व जामीन हायकोर्टाने फेटाळला



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** शहरातील नगर-पुणे रोडवर गेल्या महिन्यात तरुण व्यावसायिक रोहित पाथरकर यांना झालेल्या मारहाण प्रकरणातील मुख्य आरोपी असलेले भाजप नगरसेवक सागर राजू मुर्तडकर (वय ३२ वर्षे, रा. वंजार गल्ली, मंगलगेट) यांना न्यायालयाकडून मोठा दणका बसला आहे. जिल्हा न्यायालयाने या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत मुर्तडकर यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यानंतर मुर्तडकर यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. मात्र हायकोर्टातही मुर्तडकर यांना दिलासा मिळू शकला नसून काल (दिनांक १६) झालेल्या सुनावणीत त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज हायकोर्टाने फेटाळून लावला आहे.

गेल्या महिन्यात १४ सप्टेंबरच्या मध्यरात्री नगर-पुणे रोडवरील राजश्री हॉटेलसमोर रोहित पाथरकर यांच्यावर हल्ला झाला होता. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात सागर मुर्तडकर आणि त्यांच्या इतर चार साथीदारांवर जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी काही दिवसांपूर्वी सागर मुर्तडकर यांच्या वतीने जिल्हा न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला होता. न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने जामिनाला कडाडून विरोध केला. युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने नगरसेवक सागर मुर्तडकर यांचा जामीन अर्ज फेटाळला होता. दरम्यान, त्यानंतर मुर्तडकर यांनी हायकोर्टात धाव घेतली होती. न्यायमूर्ती आर. एम. जोशी यांच्या खंडपीठासमोर शुक्रवारी यावर सुनावणी झाली व न्यायालयाने अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळून लावला. या प्रकरणात फिर्यादीच्या वतीने एन. बी. नरवडे यांनी काम पाहिले.

### न्यायालयासमोर आलेले मुद्दे

फिर्यादी रोहित पाथरकर यांना झालेली मारहाण अत्यंत गंभीर स्वरूपाची असून, त्यांच्या चेहऱ्याचे आणि नाकाचे हाड फ्रॅक्चर झाले आहे. तसेच आरोपीने फिर्यादीच्या छातीवर बसून नाक-तोंड दाबून श्वास कोंडत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला. वैद्यकीय अहवालातही दोन गंभीर दुखापतींसह एकूण आठ जखमांची नोंद आहे. अशा गंभीर गुन्ह्यातील मुख्य आरोपीला जामीन दिल्यास तपासावर दबाव येऊ शकतो, असे मुद्दे सरकार पक्ष व फिर्यादीच्या वकिलांच्या वतीने न्यायालयासमोर मांडण्यात आले.

### गेल्या महिन्यात घडली घटना

दिनांक १४ सप्टेंबर रोजी रात्री रोहित पाथरकर हे मित्रासोबत घरी परतत असताना सागर मुर्तडकर आणि त्यांचे भाऊ आकाश, श्रीकांत तसेच कार्यकर्ते गणेश सुंबे व शिवम शिंगटे यांनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली होती. या हल्ल्यात रोहित पाथरकर गंभीर जखमी झाले व त्यांच्यावर अतिदक्षता विभागात उपचार करण्यात आले. या प्रकरणात मुख्य आरोपी सागर मुर्तडकर यांना अटकपूर्व जामीन न मिळाल्याने आता पोलिसांच्या पुढील कारवाईकडे शहराचे लक्ष लागून आहे.

# मुळा धरणावरील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करा!

**। महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांची महावितरण प्रशासनाला सूचना । पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने केडगावकर त्रस्त; महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक संपन्न**



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** मुळा धरण येथून अहिल्यानगर शहराला सुमारे ३० किलोमीटर अंतरावरून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, गेल्या महिनाभरापासून मुळा धरण परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने शहराचा पाणीपुरवठा विस्कळीत होत आहे. परिणामी, नागरिकांना पाण्यासाठी विविध समस्यांना सामोरे जावे लागत असून, नागरिकांचा रोष महानगरपालिका प्रशासन आणि नगरसेवकांना सहन करावा लागत आहे. ही परिस्थिती लक्षात घेऊन महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव आणि आयुक्त यशवंत डांगे यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यांसोबत बैठक घेत खंडित होणारा वीजपुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली.

मिळालेल्या माहितीनुसार, महिनाभरापासून मुळा धरण परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. एक ते १४ तारखेच्या कालावधीत सुमारे आठ वेळा वीजपुरवठा खंडित झाला. वीजपुरवठा पुन्हा सुरू झाल्यानंतरही पाणीपुरवठा पूर्ववत होण्यासाठी सुमारे तीन तासांचा कालावधी लागतो. त्यामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडून शहरातील विविध भागांना पाणी मिळण्यास विलंब होत आहे.

विशेषतः केडगावसारख्या मोठ्या उपनगरात पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांना पाण्याच्या समस्येला सामोरे जावे लागत आहे. या परिस्थितीमुळे नागरिकांकडून नगरसेवक आणि महापालिका प्रशासनाविषयी नाराजी व्यक्त केली ■ पान ४ वर

# अहिल्यानगर शहरात ‘जागर नारी शक्तीचा’ दांडिया नाईटचे आयोजन

**महिला घेणार पर्यावरण संवर्धनाची शपथ । उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या पुढाकारातून भव्य सामाजिक व सांस्कृतिक सोहळा । आ. संग्राम भैय्या जगताप, धनश्रीताई विखे पाटील व भाजप पदाधिकारी व नगरसेवक यांची प्रमुख उपस्थिती । ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी मोहिमेचा होणार प्रसार**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या संकल्पनेतून आणि विशेष प्रयत्नातून यंदाच्या नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून जागर नारी शक्तीचा - दांडिया नाईट २०२६ (व्हॉल्यूम ८.०) चे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हा सोहळा रविवार, १८ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६:०० वाजता नगर-शिर्डी रस्त्यावरील दत्तात्रय जाधव नगर येथील बंधन लॉन्स येथे पार पडणार असून, यामध्ये सांस्कृतिक उत्साहाबरोबरच



सामाजिक व पर्यावरणीय बांधिलकी जपली जाणार आहे.

**ग्रीन सिटी मोहीम आणि पर्यावरण संवर्धनाची शपथ**

या कार्यक्रमादरम्यान ना. राधाकृष्ण विखे पाटील ग्रीन सिटी (हरित शहर) या विशेष मोहिमेबद्दल उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन व ■ पान ४ वर

# नवनागापूर पाणीप्रश्नाला आ. दातेंच्या पाठपुराव्याने गती

**जलजीवन मिशनअंतर्गत ३०० मिमी नवीन पाणीवाहिनीच्या कामाचा मार्ग मोकळा**

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** नवनागापूर (ता. नगर, जि. अहिल्यानगर) येथील पाणीपुरवठा योजनेअंतर्गत नवीन ३०० मिमी पाणीवाहिनीच्या कामासाठी आवश्यक मंजुरी मिळवून देण्याच्या प्रक्रियेत आमदार काशिनाथ दाते सर यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले आहे. या कामाला गती मिळाल्याने नवनागापूर येथील ग्रामस्थांनी आमदार



काशिनाथ दाते सर यांचा सत्कार करून त्यांचे आभार मानले.

नवनागापूर गावातील पाणीपुरवठा अधिक सक्षम करण्यासाठी जलजीवन मिशनअंतर्गत नवीन पाणीवाहिनी टाकण्याचे काम प्रस्तावित होते. या कामासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया आणि मंजुरीसंदर्भात ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधित विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत होता. या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात घेऊन ग्रामस्थांनी आमदार काशिनाथ दाते सर ■ पान ४ वर

# अहिल्यानगरचे सुपुत्र डॉ. सचिन रोंदिया यांना आयआयएससीचा उत्कृष्ट अध्यापन पुरस्कार

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतातील अग्रगण्य विज्ञान संस्था ‘इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स’ () बंगळुरू येथील प्राध्यापक तथा प्रख्यात शास्त्रज्ञ डॉ. सचिन राजेश रोंदिया यांना प्रतिष्ठेचा ‘आयआयएससी एक्सलन्स इन टीचिंग २०२६’ २०२६) हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या या उत्तुंग यशामुळे अहिल्यानगरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. मूळचे अहिल्यानगरमधील पाईपलाइन रोड, श्रीराम चौकातील रहिवासी असलेले डॉ.



सचिन रोंदिया यांनी विज्ञान, संशोधन आणि अध्यापन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांच्या अध्यापन कौशल्याची आणि संशोधक वृत्तीची दखल घेऊन संस्थेने त्यांना या राष्ट्रीय स्तरावरील मानाच्या पुरस्काराने सन्मानित केले.

डॉ. रोंदिया यांच्या या यशामुळे नगरकरांची मान अभिमानाने उंचावली असून, तरुण संशोधकांसाठी त्यांची ही कामगिरी प्रेरणादायी ठरत आहे. या यशाबद्दल डॉ. सचिन रोंदिया व त्यांच्या कुटुंबीयांवर विविध क्षेत्रांतून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



## दै. आकर्षण निवडक

### नवरात्रोत्सवात हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने भाविकांना खिचडी व फळांचे वाटप



अहिल्यानगर- सामाजिक, आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात सातत्याने कार्यरत असलेल्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून भिंगार येथील विजयलाइन चौकातील अंबिका तरुण मंडळाच्या तुळजामाता मंदिरात दर्शनासाठी आलेल्या भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करण्यात आले. तसेच मंदिर परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. पावसाअभावी निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीतून नागरिकांना दिलासा मिळावा आणि सर्वत्र समाधानकारक पाऊस पडावा, यासाठी तुळजामाता चरणी प्रार्थनाही करण्यात आली.कार्यक्रमाच्या प्रारंभी मंदिर परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. रतन मेहेत्रे, ताराचंद ठोकळ आणि अशोक पराते यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढते तापमान, पावसाचे बदलते प्रमाण, पाण्याची टंचाई आणि दुष्काळाचे संकट लक्षात घेता वृक्षारोपण व संवर्धनाचे आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी पर्यावरणाचे संरक्षण करणे आणि दुष्काळी परिस्थितीत पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. केवळ वृक्षारोपण करून न थांबता लावलेल्या झाडांचे संगोपन आणि संवर्धन करण्याची जबाबदारीही प्रत्येकाने स्वीकारण्याचे स्पष्ट करण्यात आले.भाविकांना खिचडी व फळांचे वाटप करताना भिंगार कॅम्प पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात, अजय गव्हाणे, हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, सचिन चोपडा, सरदारसिंग परदेशी, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, प्रांजली सपकाळ, जोगिंदरसिंग, ईशान शेख, जैद सय्यद, प्रशांत चोपडा अश्विनी गोरखे, लताताई गुरव, माधवी माळगे, संगीता सपकाळ, अनिता शेलार, कीर्ती ठाकूर, महिमा माळगे, अंजना भुजबळ, सुनिता गडाख, दिलीप ठोकळ, रमेश वराडे, ईवान सपकाळ, विलास आहेर, मंदिराचे पुजारी सुनील देवा गुरव, नंदू भंडारे, राहुल पानसरे, सोनू भुजबळ, संजय येलुलकर, सरोवर खान, अश्विन ठाकूर आदींसह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजस्विनी थोरात यांनी धार्मिक उत्सवाच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रम राबविण्याचे महत्त्व अधोरेखित केले. अन्नदान, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन आणि सार्वजनिक स्वच्छता या गोष्टी समाजाच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असून, त्यासाठी प्रत्येकाने आपापल्या परीने योगदान देणे आवश्यक असल्याची भावना व्यक्त केली.

# विद्यार्थ्यांनी पुस्तक ‘वेडे’व्हा - शिवाजीराव नाईकवाडी

## वाचन प्रेरणा दिनी जिल्हा वाचनालयाच्या वतीने विद्यार्थ्यांशी संवाद

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी



**अहिल्यानगर–** भारतासारख्या प्रगत असलेल्या देशात तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मोबाईल प्रत्येकाच्या हाती आहे. मात्र त्यातून मिळणाऱ्या माहितीवर अवलंबून न राहता आपण पुस्तक वाचनातून न ज्ञानी व्हावे. जीवनात यश मिळवायचे असेल तर पुस्तक ‘‘वेडे ‘‘व्हा. तेच तुम्हाला खऱ्या अर्थाने यशस्वी माणूस म्हणून घडवतील‘‘ असा दुर्दम्य आशावाद सामाजिक कार्यकर्ते व माणुसकीची शाळा चे प्रणेते शिवाजीराव नाईकवाडी यांनी व्यक्त केला. भूतपूर्व राष्ट्रपती डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त ‘‘वाचन प्रेरणा दिनी‘‘ अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात आयोजित कार्यक्रम प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद साधत होते. यावेळी हिंद सेवा मंडळाच्या संचालिका प्राध्यापिका ज्योती कुलकर्णी ,पुस्तकांच्या चळवळीत कार्य करणाऱ्या अक्षरवेलच्या सौ रूपाली सोनवणे ,वाचनालयाचे उपाध्यक्ष दिलीप पांढरे, मुख्याध्यापक चित्रकार अशोक डोळसे, ग्रंथपाल अमोल इथापे, सहाय्यक ग्रंथपाल नितीन भारताल, पल्लवी कुक्कडवाल ,संजय गाडेकर ,आदी उपस्थित होते. प्रा. ज्योती कुलकर्णी यांनी यावेळी बोलताना‘‘ वाचन,खेळ,लेखन यातून युवा वर्गाचे व्यक्तिमत्व घडते. माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांचा वाचनातून प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळवलेला यशाचा व कार्याचा आदर्श आज आपल्यासमोर आहे. आपण अखंडपणे वाचन करून आपल्या ही जीवनात यश मिळवावे असे प्रतिपादन केले . जिल्हा वाचनालयाच्या वतीने दादा चौधरी च्या विद्यार्थ्यांना मोफत सभासदत्व देण्यात येणार आहे. याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा.

प्रास्ताविक मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी ‘‘वाचनातून मिळालेली प्रेरणा ही आपल्याला बिकट परिस्थितीतही यशाच्या मार्गावर घेऊन जाते. शालेय जीवनात वाचनाचे संस्कार हे पुढील यशस्वी जीवनासाठी प्रेरक असल्याने विद्यार्थी दशेत वाचनाच्या संस्काराची कास धरणे महत्त्वपूर्ण असल्याचे ते म्हणाले .

यावेळी दादा चौधरी शाळेच्या वतीने उपस्थित मान्यवरांचा पुस्तके देऊन सन्मान करण्यात आला. वाचन प्रेरणा दिनानिमित्त विद्यार्थ्यांनी विविध पुस्तकांचे सामूहिक वाचन करून वाचन प्रेरणाची शपथ घेतली. यामध्ये कु. खुशी दरेकर ,साई ठोंबे ,प्रिन्स वाघमारे ,ऋषिकेश सपकाळ, अनुष्का चंगेडिया ,सुदर्शन जाधव, साईनाथ म्हस्के ,रवी राठोड, यश काळे ,यश चव्हाण यांनी विविध पुस्तक वाचन करून आपला सक्रिय सहभाग नोंदवला. यावेळी श्री जोशी सर सौ गुंडू ,सौ घोडे, सौ धारणगावकर ,श्री कुलकर्णी, आदी शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .आभार ग्रंथपाल अमोल इथापे यांनी मानले.

# नान्नज येथे जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपबाजार आवार उभारण्याचा मार्ग मोकळा

## कृषी उत्पादकांना आर्थिक बळ मिळणार । माननीय सभापती प्रा. राम शिंदे यांच्या प्रयत्नांना यश



**मुंबई । वृत्तसंस्था–** अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातील नान्नज येथे जामखेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार आवारासाठी २ हेक्टर ४० आर शासकीय जमीन देण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे. या जमिनीसाठी नाममात्र एक रुपया कब्जेहक्क रक्कम आकारण्यात येणार असून, महसूल विभागाने आज यासंदर्भातील शासन ज्ञापन जारी केले. माननीय सभापती प्रा. राम शिंदे यांनी याबाबत जातीने लक्ष दिले होते.

नान्नज येथील गट क्रमांक १०६३ मधील एकूण १० हेक्टर ४० आर क्षेत्रापैकी ही जमीन देण्यात येणार आहे. उपबाजार आवारासाठी जमीन उपलब्ध व्हावी, यासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावास पणन संचालकांची शिफारस तसेच पणन विभाग आणि वित्त विभागाची सहमती मिळाल्यानंतर शासनाने हा निर्णय घेतला.

उपबाजार आवार उभारल्यामुळे नान्नज आणि परिसरातील शेतकऱ्यांना कृषी उत्पन्नाच्या खरेदी-विक्रीसाठी स्थानिक पातळीवर बाजारपेठेची सुविधा विकसित करण्याची संधी उपलब्ध होणार आहे. परिसरातील शेतीमालाच्या व्यापाराला चालना देण्याच्या दृष्टीने या निर्णयाला महत्त्व आहे. बाजार समितीच्या माध्यमातून उपबाजार आवारासाठी आवश्यक पायाभूत सुविधा विकसित करण्याचा पुढील मार्ग यामुळे सुकर होणार आहे.

सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ धारणाधिकाराने देण्यात येणार असून, त्यासाठी बाजार समितीला जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्यासोबत आवश्यक करारनामा करावा लागणार आहे. जमीन ताब्यात मिळाल्यानंतर तीन वर्षांच्या आत मंजूर प्रयोजनासाठी वापर सुरू करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच, संबंधित नियोजन प्राधिकरणाची परवानगी आणि अन्य आवश्यक शासकीय मंजुऱ्या घेऊनच विकासकामे करावी लागतील. जमिनीचा वापर केवळ मंजूर प्रयोजनासाठीच करता येणार असून, शासनाने घालून दिलेल्या अटी व शर्तींचे पालन करणे बाजार समितीस आवश्यक राहील.

# अहिल्यानगर ची नवदुर्गा.. कु.श्रध्दा अष्टेकर



अगदी सकाळीच जुने जिल्हा न्यायालय समोर वकील मित्रमंडळी सोबत चाय पे चर्चा करत असतानाच सायकल वरून वर्तमानपत्र टाकणाऱ्या एका मुलीकडे सहजच लक्ष गेले. न राहुन मी तिच्याबरोबर बोलायला लागलो.

आजकाल महिला सबली करणावर भरभरून चर्चा होत आहे. काही महिला किंवा मुली काम असुनही करीत नाहीत किंवा काहीना कामकाज मिळत नाही. पुरूष प्रधान संस्कृतीत काही पुरूष मंडळी कधी कधी महिलांना जाणुन बुजुन दुर्लक्षित करतात तर काहि महिला पुरूष मंडळीना विनाकारण त्रास देतात.

केवळ काम नाही म्हणून घरातील लोकांवर अवलंबून असणा-या अनेक मुली आहेत. आज महिला देशातील सर्वोच्च पदावर कार्यरत आहे. असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिलां भगिनीनीं आपल्या कार्याचा ठसा उमटवला नाही. मग नगरची नवदुर्गा श्रध्दा याला कशी अपवाद असणार. श्रध्दा बरोबर पाच मिनिटाच्या गप्पांमधून खरोखरच वाटले की, कोणत्याही परिस्थितीवर बेधडक पणे मात करण्याची जिद्द या मुलीकडे आली कुठून. श्रध्दाचे वडील संतोष दत्तात्रय अष्टेकर आणि आई सौ वैशाली हे अतिशय गरीब असलेले कुटुंब. श्रध्दाला भक्ती आणि आराध्या या दोन बहिणी आहेत. श्रध्दाला भाऊ नाही. परंतु श्रध्दाने भावाची उणीव आईवडीलानां भासु दिली नाही. लहानपणापासूनच आजीच्या खानावळीत छोटीशी कामं करून मदत करणारी श्रध्दा कधीच डगमगून गेली नाही. आई वडील कामासाठी बाहेर गेल्यावर श्रध्दा घरातील कामकाज करुन आपल्या बहिणींची काळजी घेत होती. आईवडीलांना हातभार लावत होती. तिला थोडं बोलतं केल्यावर श्रद्धा निर्भिड पणे म्हणाली,‘‘ काम कोणतेही लहान नाही, आपण चोरी करून पैसे मिळवत नाहीत, त्यामुळेच मी बिनधास्तपणे वयाचे सोळाव्या वर्षापासून वर्तमानपत्र वाटपाचे काम करीत आहे‘‘.

एकंदरीत तिच्याबरोबर बोलताना तिचा निर्भिड पणा जाणावला.

आजोबां बरोबर आणि वडिल यांचे बरोबर पेपर स्टॉलवर पेपर विक्री करुन श्रध्दा शिक्षण घेत होती. आज ती एमएस्सी मायक्रो बायोलॉजी चे शिक्षण घेत आहे. उन वारा पाऊस याची तमा न बाळगता श्रध्दा सायकल वरुन घरोघर जावुन वर्तमानपत्र टाकायचे काम करते. खरं तर आज सायकल वर वर्तमानपत्र वाटायचे दिवस नाहीत, कारण प्रत्येकालाच टुव्हिलर असते. मला असं वाटतंय की,वर्तमानपत्राचे क्षेत्रात अनेक महिला भगिनी चांगले काम करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. त्यांचे कार्य तर कौतुकास्पद आहेच . परंतु अहिल्यानगर मधे वर्तमानपत्र वाटणारी श्रध्दा हि कदाचित एकटीच मुलगी असावी. खरंतर वर्तमानपत्रात कार्य करणारे पत्रकार बांधव, संपादक साहेब आणि नगरवासियानीं या नवदुर्गेच्या कामाची दखल घेतली पाहिजेत. जर शक्य असेल तर तिला काही मदत करता येईल काय याचा विचार अहिल्यानगर च्या लोकप्रतिनिधीं कडून झाला तर तिचे पुढील शिक्षण सहज शक्य होईल. शिक्षणाचे आड गरीबी कधीच येत नाही हे श्रध्दाने सिध्द करून दाखवले असं म्हणायला हरकत नाही. नवरात्रोत्सवा निमित्त या नवदुर्गेची आणि माझी भेट होईल असे वाटले नव्हत. श्रद्धा सारख्या नवदुर्गेला मनापासून मनापर्यंत मानवंदना आणि पुढील वाटचालीस हार्दिक हार्दिक शुभेच्छा.

**शब्दांकन–**
अ‍ॅड. शिवाजी अण्णा कराळे पाटील
९४ २२ २२ १८५७

# पैठणमध्ये जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; माजी नगरसेवकासह पाच जणांवर कारवाई

## कापड मंडई परिसरात ‘तिरट’ जुगार सुरू असताना कारवाई; ८ हजार २५० रुपये रोख व जुगाराचे साहित्य जप्त

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** पैठण शहरातील कापड मंडई परिसरात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पैठण पोलिसांनी छापा टाकून पाच जणांविरुद्ध कारवाई केली. या कारवाईत ८ हजार २५० रुपये रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. १४ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ११.४० वाजता ही कारवाई करण्यात आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कापड मंडई परिसरातील बाळू पटेल यांच्या घरासमोरील ओट्यावर काही जण विनापरवाना पैशांची बाजी लावून ‘तिरट’ नावाचा पत्त्यांचा जुगार खेळत असल्याची बाब समोर आली. त्यानुसार पैठण पोलिसांनी कारवाई करत शिवनाथ सिताराम सोनटक्के (वय ५५, रा. लक्ष्मीनगर, पैठण), रईस महेमुद कुरेशी (वय ४५), अयुब इब्राहीम कुरेशी (वय ५८, दोघेही रा. दारुसलाम मोहल्ला, पैठण), नितीन श्रावण खुडे (वय ५२, रा. साळीवाडा, पैठण) आणि ईनाम फसीओद्दीन अन्सारी (वय ५५, रा. चौधरी मोहल्ला, मेन रोड, पैठण) यांच्याविरुद्ध कारवाई केली. घटनास्थळावरून ८ हजार २५० रुपये रोख आणि जुगाराचे साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी फिर्याद पोलीस उपनिरीक्षक ऋषिकेश संभाजी तळेकर यांनी दिली. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस हेड कॉन्स्टेबल माळके यांनी केली असून, पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल गायकवाड करीत आहेत.

# सनातन धर्मसभेत केलेल्या गायन कार्यक्रमाचे समाधान - डॉ. सौ. धनश्री खरवंडीकर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** धार्मिक क्षेत्रात अत्यंत पवित्र काम करत असलेल्या सनातन धर्मसभेतर्फे अनेक वर्षापासून शारदीय व्याख्यानमाला अखंडपणे चालू आहे. त्यांच्या या कार्यात आम्हास सुमारे वीस वर्षापासून गायन सेवा करण्याची सुवर्णसंधी सनातन धर्मसभेतर्फे दिली जात आहे. त्याबद्दल आम्ही संस्थेचे त्याचप्रमाणे आई जगदंबेचे ऋणी आहोत, असे प्रतिपादन श्रुती संगीत निकेतन संस्थेच्या संचालिका डॉ. सौ. धनश्री खरवंडीकर यांनी व्यक्त केले. सनातन धर्मसभेच्या शारदीय व्याख्यानमालेच्या कार्यक्रमात संस्थेचे मुख्य संचालक मकरंद खरवंडीकर यांच्या कलाकारांनी स्वरंबिका या भक्ती गीतांचा बहारदार कार्यक्रम संपन्न झाला.

प्रथम श्री. व सौ. खरवंडीकर यांच्या कलाकारांनी समावेश सरस्वती पूजन करण्यात आले. वेदमूर्ती चकोर मुळे यांच्या मंत्रघोषाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. संस्थेचे मंत्री दिनकर देशमुख यांनी कलाकारांचे स्वागत केले. मंत्री रमेश देशपांडे यांच्या हस्ते श्री. व सौ. खरवंडीकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी चकोर मुळे, उदय वैकर, ज्येष्ठ विधीतज्ञ अच्युतराव पिंगळे, भगवानराव देशपांडे आदि उपस्थित होते. नवरात्रीचा उत्सव, ललिता पंचमीचा पावन सण, स्वरांच्या भक्तीतून देवीचं मनोभावे स्मरण करून श्रुती संगीत निकेतने ’स्वरंबिका’ सुरेल साज, गीत संगीताच्या भक्तिरंगात सनातन धर्मसभेच्या श्री ज्ञानेश्वर सभागृह येथे संध्याकाळ केवळ संगीताची मैफल नाही, तर स्वर, साधना, श्रद्धा आणि शक्ती यांचा सुंदर संगम झाली.

नवरात्री म्हणजे आदिशक्तीच्या उपासनेचा उत्सव! या नऊ दिवसांत देवीच्या विविध रूपांचे स्मरण, शक्तीचा जागर करत आणि तिच्या चरणी आपली भक्ती अर्पण करत संगीत समर्पित केली. देवीच्या आराधनेसाठी मनाची एकाग्रता आवश्यक असते, तसेच प्रत्येक स्वर अचूक लावण्यासाठी रियाज आणि समर्पण आवश्यक असते.

जेव्हा भक्तीला स्वरांची साथ मिळते, तेव्हा प्रार्थनेचे गीत होते आणि जेव्हा प्रत्येक स्वर समर्पणाने उमटतो, तेव्हा संगीतही ईश्वरसेवा बनते.

या सुरेल मैफलीमध्ये श्रुती संगीत निकेतनच्या सावेडी शाखेतील सुगम संगीत वर्गातील सर्व महिला चेतना नवले, वृषाली गाय कैवारी, विद्या मुळे, मीरा बेलेकर, स्मिता मिस्त्री, अश्विनी भाणगे, अलका भालेकर, माधुरी माचवे, साधना इनामदार, जयश्री मोरे, डॉ. धनश्री खरवंडीकर यांनी आपल्या सुमधुर आवाजातून गीतांची सुंदर मेजवानी श्रुती वर्गासमोर सादर केली. संगीत ही केवळ स्वरांची आराधना नसते, तर ती मनाला आनंद देणारी, भावनांना स्पर्श करणारी आणि आयुष्याला नवी उमेद देणारी एक सुंदर अनुभूती असते. अशाच या भक्तिमय वातावरणात आपल्या सुरेल सादरीकरणातून देवीच्या चरणी स्वरपुष्पे अर्पण केली. भारतीय संस्कृतीत कोणत्याही शुभकार्याची सुरुवात विघ्नहर्त्या श्री गणेशाच्या स्मरणाने केली जाते. बुद्धी, विवेक आणि मांगल्याचे प्रतीक असलेल्या गणरायाच्या आशीर्वादाने कार्य निर्विघ्न पार पडावे, हीच प्रत्येकाची भावना असते.




संगीताच्या विश्वातही सुरुवात महत्त्वाची असते. पहिला स्वर योग्य लागला, की पुढील स्वरप्रवास अधिक सुंदर होतो. अगदी त्याचप्रमाणे, गणरायाचे स्मरण

प्रथम वंदू गणराया, मंगलमूर्ती देवा,
तुझ्या कृपेने सफल होवो भक्तीचा हा ठेवा;
विघ्नांचे अंधार दूर होवोत, सुखाचा उजेड येवो,
तुझ्या नामाने आजच्या सोहळ्याचा श्रीगणेशा होवो!

या आद्य शंकराचार्यांनी रचलेले ‘महागणेश पंचरत्न स्तोत्र’ करण्यात आली. माता सरस्वतीच्या हातातील वीणा ही संगीतकलेचे, तर पुस्तक हे ज्ञानाचे प्रतीक मानले जाते. तिचे स्मरण आपल्याला कलेसोबत नम्रता आणि सातत्य जपण्याची प्रेरणा देते.

वीणेच्या झंकारात निनादो भक्तीचा गंध,
स्वरांच्या संगतीने खुलो सुरांचा छंद;
ज्ञानाचा दीप उजळो, कलेला लाभो मान,
हे शारदे, तुझ्या चरणी अर्पितो स्वरांचे गान!

संगीत शिकणे म्हणजे केवळ गाणे शिकणे नव्हे, तर प्रत्येक स्वरातून स्वतः ला अधिक समृद्ध करणे होय.

नवरात्री हा असा उत्सव आहे, ज्यामध्ये प्रत्येक घरात भक्तीचा उत्साह, आनंदाची चाहूल आणि देवीच्या आगमनाची आतुरता असते.

देवीचे अनेक रूप आहेत तिची नावे अनेक आहेत, पण प्रत्येक रूपातून मिळणारी ऊर्जा एकच श्रद्धेची धैर्याची आणि सकारात्मकतेची ऊर्जा आणि जेव्हा या श्रद्धेला संगीताचे साथ मिळते तेव्हा भक्तीला स्वरांचे पंख लागतात. जर घरी कोणी पाहुणे आले तर घर आनंदाने भरून जाते तर मग आनंदाला मर्यादाच पुरत नाही. नवरात्री म्हणजे आपल्या घरी आपल्या मनामध्ये आणि आपल्या जीवनामध्ये देवीच्या आगमनाचा उत्सवू होय, तिचे स्वागत पाहुणी आली माझ्या घरी! या गीताने करण्यात आले. देवीची रूपे अनेक, नावे अनेक; पण प्रत्येक रूपातून प्रकट होणारी शक्ती भक्तांना धैर्य, विश्वास आणि प्रेरणा देते. कधी ती दुर्गा बनून अन्यायाविरुद्ध उभी राहते, कधी भवानी बनून रक्षणाचे प्रतीक ठरते, तर कधी जगदंबा बनून आपल्या लेकरांवर मायेचा वर्षाव करते.नवरात्रीमध्ये देवीच्या या विविध रूपांचे स्मरण करतो. तिचा जयजयकार करताना आपण केवळ तिच्या शक्तीचे गुणगान करत नाही, तर आपल्या मनातील श्रद्धेलाही जागृत करतो. असे एक गीत

तूच शक्ती, तूच भक्ती, तूच मायेची सावली,
तूच संकटात धावणारी जगदंबा माऊली;
तुझ्या तेजाने उजळो जीवनाची वाट,
तुझ्या कृपेने लाभो आनंदाची पहाट! सादर करून उपस्थितांना भक्तीमय वातावरणात तल्लीन करण्यात आले.

संगीतातील प्रत्येक स्वर जेव्हा श्रद्धेने उमटतो, तेव्हा तो भक्तीचा जयघोष बनतो.अशाच भक्तिभावाने आदिशक्तीला वंदन करत - ‘जय जय हे भगवती!’ या गीताबरोबरच अनेक देवीचे भक्तीमय गाणी सर्व कलाकार मधुर आवाजात गायली.महाराष्ट्राच्या इतिहासात आणि भक्तिपरंपरेत भवानी मातेचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. तुळजापूरची तुळजाभवानी ही महाराष्ट्रातील प्रसिद्ध शक्तिपीठांपैकी एक आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनाशीही भवानीमातेच्या श्रद्धेची परंपरा जोडली जाते. संकटांशी लढण्याचे बळ, तुझ्या नामात आहे, भक्तांच्या हृदयातील श्रद्धा, तुझ्याच ध्यासात आहे; तुझ्या कृपेने फुलू दे सुखाचा संसार, हे माय भवानी, तुझा महिमा अपरंपार!

‘माय भवानी!’

आई म्हटलं की डोळ्यांसमोर येते ती माया, आपुलकी आणि आपल्या लेकरांसाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी!

देवीच्या रूपातही आपल्याला मातेची हीच माया अनुभवायला मिळते. कधी ती दुर्गा बनून दुष्टांचा संहार करते, तर कधी प्रेमळ माऊली बनून आपल्या भक्तांना मायेच्या कुशीत घेते.

देवीची ही कोमल आणि प्रेमळ बाजू आपल्या भक्तिगीतांमधून सुंदरपणे व्यक्त होते. म्हणूनच संगीत हे केवळ देवीच्या शक्तीचे वर्णन करत नाही, तर तिच्या वात्सल्याची अनुभूतीही देते.

रूप तुझे सुंदर, माया तुझी अपार,
तुझ्या चरणी अर्पिते भक्तीचा हार;
तुझ्या नामाने मनाला लाभतो आधार

भजनामध्ये जेव्हा आपण माऊलीचा धावा करतो, तेव्हा त्या सुरांतून केवळ शब्द नाही, तर भक्ताच्या मनातील प्रेम आणि विश्वासही व्यक्त होतो, याला अनुसरून एक सुंदर असे भावपूर्ण गीत

मायेचा सागर, प्रेमाची सावली, ‘माझी रेणुका माऊली!’

असे भक्तीचे अनेक भाव अनुभवले - कधी प्रार्थना, कधी मायेचा गोडवा, तर कधी देवीच्या शक्तीचा जयजयकार करत करण्यात आली.

महाराष्ट्राच्या समृद्ध लोकपरंपरेतील एका उत्साही भक्तिप्रकाराची - म्हणजेच ‘गोंधळाची!’गोंधळ हा देवीच्या उपासनेशी संबंधित पारंपरिक लोककलाप्रकार आहे. संबळाचा नाद, टाळांचा गजर, देवीच्या नावाचा जयघोष आणि लोकसंगीताची लय यांमधून आपल्या संस्कृतीचे सुंदर दर्शन घडते. या गोंधळाने रसिका तल्लीन झाले. शास्त्रीय संगीतामध्ये राग आणि तालाची शिस्त आपल्याला अनुभवायला मिळते, तर लोकसंगीतामध्ये आपल्या मातीचा सुगंध आणि लोकजीवनातील श्रद्धेचा आविष्कार दिसतो. संगीताचे हेच वैशिष्ट्य आहे त्याची रूपे बदलतात, पण भावनेला जोडण्याची ताकद कायम राहते!

संबळाचा नाद घुमू दे, टाळांचा होऊ दे गजर,
अंबाबाईच्या नावाने दुमदुमू दे आसमंत सारा;
भक्तीचा रंग चढू दे, उत्साहाला येऊ दे भर,
आईच्या गोंधळात रंगून जाऊ दे चराचर! हे गीत सादर करण्यात आले.

आकर्षण हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी दैनिक आकर्षण प्रिंटर्स , प्लॉट क्र. ९२, भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस- प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक विजय शामराव सांगळे, व्यवस्थापक तुकाराम कामटे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर - ७७७६८१२८११. ई-मेल: dainikaakarshan@gmail.com. (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at DAINIK AKARSHAN PRINTERS, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). "Editor - Vijay Shamrao Sangale, Manager - Tukaram Kamte, Phone no. of main office-7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com ("The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासाठी मागणीसाठी रिपाइंचा साखळी उपोषणाचा आठवा दिवस



अहिल्यानगर - मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्यासह त्यांच्यावर कठोर कारवाई करावी आणि मतदारांच्या हक्कांवर परिणाम होण्याची शक्यता असल्याचा आरोप करत विशेष सखोल मतदार यादी पुनरीक्षण प्रक्रिया (एसआयआर) रद्द करावी, या मागण्यांसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाच्या वतीने अहिल्यानगर शहरात साखळी उपोषण सुरू आहे. मार्केटयार्ड चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या या आंदोलनाचा शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) आठवा दिवस होता. दरम्यान, रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र गवई यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन उपोषणात सहभाग नोंदवला. 'ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याशिवाय माघार घेणार नाही,' असा ठाम निर्धार व्यक्त करत त्यांनी आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही दिला.मार्केटयार्ड चौकातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोर सुरू असलेल्या साखळी उपोषणात सहभागी आंदोलकांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी जोरदार घोषणाबाजी केली. आठ दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनाच्या माध्यमातून रिपाइंने आपली भूमिका आक्रमकपणे मांडली आहे. या आंदोलनात रिपाइंचे शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, दादासाहेब रोहम, किशोर वाघमारे, दत्ताभाऊ झावरे (पुणे), गुलाम शेख, विजय शिरसाठ, अजीम खान, नईम शेख, विल्सन रुकडीकर, स्वप्नील साठे, राहुल ठोकळ, अझीझ शेख, शुभम दारकुंडे, जालिंदर कानडे, लकी वाघमारे, अरबाज शेख, जमीर सय्यद, जावेद शेख, आयन शेख, नजीर देशमुख, पीटर लोंढे, रईस शेख, तौसिफ शेख, जावेद सय्यद, जफर काझी, फारूक शेख, प्रशांत आठवले, योहान चाबुकस्वार आणि चिकू गायकवाड यांच्यासह महिला आघाडीच्या ज्योती पवार, संपदा म्हस्के, मनीषा गायकवाड, विश्रांती पठारे, प्रियंका पठारे, शीतल नाटिकर, रेश्मा जाधव आणि प्रमिला शिरसाठ यांच्यासह महिला कार्यकर्त्यांनीही आंदोलनात सहभाग घेतला.

रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र गवई म्हणाले की, निवडणूक आयोगाच्या कामकाजात कथित अनियमितता होत असल्याच्या मुद्द्यावरून मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या राजीनाम्याची मागणी रिपाइंने केली आहे. या मागणीवर पक्ष ठाम असून, राजीनामा होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार आहे. मागणी मान्य न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. राजीनामा घेतल्याशिवाय रिपाइं माघार घेणार नाही, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.



औवघडपीर गुरुवर्य नौवमीनाथजी महाराज (गुरु योगी महंत सोमवार नाथजी महाराज), भुतकरवाडी यांच्या कानिफनाथ अस्थाना येथील महाकाली.

# बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी करिअर मार्गदर्शन परिसंवाद उत्साहात

## अभियांत्रिकी, वैद्यकीय प्रवेशप्रक्रिया आणि शिष्यवृत्ती योजनांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन परिसंवादाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बारावीच्या परीक्षेनंतर करिअरची योग्य दिशा निवडताना विद्यार्थ्यांमध्ये निर्णय घेण्याची क्षमता नसल्यामुळे संभ्रम अवस्था निर्माण होते. पालक आणि पाल्यांनाही अनेक प्रश्न पडतात. बारावीनंतर नेमके पुढे काय करावे.अभियांत्रिकी व वैद्यकीय क्षेत्रातील संधी प्रवेशप्रक्रिया आवश्यक कागदपत्रे आणि शिष्यवृत्ती योजनांची अचूक माहिती मिळावी या उद्देशाने अहिल्यानगरातील सावेडी येथील माऊली सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या मोफत करिअर मार्गदर्शन परिसंवादाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या शहरातील तेरा नामांकित शिक्षक व शिक्षणसंस्थांच्या संचालकांना गुरू गौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

एमआयटी–एडीटी विद्यापीठ, पुणे यांच्या प्रायोजकत्वाखाली आणि ॲडमिशन सजेशन यांच्या सहप्रायोजकत्वातून या परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. बारावीनंतर उपलब्ध असलेले विविध शैक्षणिक पर्याय, उच्च शिक्षणाच्या संधी आणि करिअर निवडीसाठी आवश्यक असणारी दिशा याविषयी तज्ज्ञांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन केले.




एमआयटी–एडीटी विद्यापीठाचे प्रतिनिधी प्रा. डॉ. राजेश जाधव आणि प्रा. अजयकुमार उगले यांनी विद्यापीठातील विविध अभ्यासक्रम, उच्च शिक्षणाच्या संधी आणि भविष्यातील करिअरच्या संधींची सविस्तर माहिती दिली. ॲडमिशन सजेशनचे प्रतिनिधी अभियंता अक्षयकुमार भंडारी आणि प्रा. सचिन कोथिंबीरे यांनी अभियांत्रिकी व वैद्यकीय अभ्यासक्रमांची प्रवेशप्रक्रिया, प्रवेशासाठी आवश्यक कागदपत्रे आणि उपलब्ध शिष्यवृत्ती योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. योग्य वेळी योग्य माहिती मिळाल्यास विद्यार्थ्यांना करिअरची दिशा निश्चित करणे अधिक सोपे होते. हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांची शैक्षणिक जडणघडण घडविण्यासह शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या अहिल्यानगरातील तेरा शिक्षक व शिक्षणसंस्थांच्या संचालकांचा एमआयटी–एडीटी विद्यापीठ आणि ॲडमिशन सजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गुरू गौरव पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. यामध्ये सह्याद्री इंटरनॅशनल ज्युनिअर कॉलेजचे संचालक प्रा. बाळासाहेब किर्तने व प्रा. नारायण शिनगारे, पोळ फिजिक्स क्लासेसच्या संचालिका प्रा. सुषमा पोळ, जोशी फिजिक्स क्लासेसचे संचालक प्रा. प्रकाश जोशी, कांडके केमिस्ट्री अकॅडमीचे संचालक प्रा. विजय कांडके, न्यू विद्यासागर क्लासेसचे संचालक प्रा. दिनकर जाधव व प्रा. अभिमन्यू कवडे, घोणसे मॅथ्स अकॅडमीचे संचालक प्रा. सच्चिदानंद घोणसे, ॲम्बिशन बायोलॉजी अकॅडमीचे संचालक प्रा. रवींद्र काळे, गवांदे मॅथ्स क्लासेसचे संचालक प्रा. प्रभाकर गवांदे, चौधरी फिजिक्स क्लासेसचे संचालक प्रा. विवेक चौधरी, ढगे केमिस्ट्री क्लासेसचे संचालक प्रा. प्रमोद ढगे आणि जावळे बायोलॉजी क्लासेसचे संचालक प्रा. सुरेश जावळे यांचा समावेश होता.

# २०० व्या साहित्य संमेलनाचा ऐतिहासिक टप्पा: डॉ. शरद गोरे यांच्या नेतृत्वात मराठी साहित्याचा सुवर्णकाळ

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** मराठी सारस्वताच्या आणि सांस्कृतिक इतिहासाच्या पटलावर एक अत्यंत सुवर्ण व अभिमानास्पद अध्याय जोडला गेला आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या माध्यमातून २०० व्या साहित्य संमेलनाला गवसणी घालण्यात आली आहे. २५ ऑक्टोबर २०२६ रोजी वडोदरा (गुजरात) येथे संपन्न होत असलेल्या सयाजीराजे गायकवाड मराठी साहित्य संमेलनाच्या शुभप्रसंगी हा २०० व्या साहित्य संमेलनाचा ऐतिहासिक टप्पा पूर्ण होत आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. शरद गोरे यांच्या अत्यंत कुशल, दूरगामी आणि प्रेरक नेतृत्वात ही अभूतपूर्व व ऐतिहासिक कामगिरी फत्ते झाली आहे. इतक्या मोठ्या संख्येने आणि सातत्याने विविध साहित्य संमेलने आयोजित करणारी ही जागतिक स्तरावरील एकमेव साहित्य संस्था ठरली असून, या अद्वितीय विक्रमी कामगिरीची नोंद अमेरिकन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड्स ने घेऊन संस्थेचा आणि मराठी भाषेचा गौरव केला आहे.

३३ वर्षांची अखंड तपस्या आणि झपाटून केलेले कार्य

या महान प्रवासामागे डॉ. शरद गोरे यांची ३३ वर्षांची अथक मेहनत, अफाट जिद्द आणि झपाटून काम करण्याची वृत्ती उभी आहे. कोणताही गाजावाजा न करता, निस्सीम साहित्य प्रेमापोटी त्यांनी जे कार्यसातत्य राखले, त्याचमुळे आज हा जागतिक विक्रम प्रस्थापित होऊ शकला आहे. डॉ. गोरे यांच्या नेतृत्वाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, ही सर्वच्या सर्व २०० संमेलने कोणत्याही प्रकारच्या शासकीय अनुदानाविना, केवळ लोकवर्गणीतून आणि जनसहभागातून अत्यंत दिमाखात पार पडली आहेत. मराठी भाषेचा गोडवा तळागाळापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत खऱ्या अर्थाने प्रेरणादायी आहे.

संमेलनांचे विस्तीर्ण क्षितीज आणि वैविध्य

डॉ. शरद गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित झालेली ही संमेलने केवळ संख्येतच नव्हे, तर विचारांच्या आणि सांस्कृतिक वैविध्याच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहेत. महाराष्ट्राच्या सीमा ओलांडून कर्नाटक, तामिळनाडू, गुजरात, दिल्ली आणि अगदी आंतरराष्ट्रीय स्तरावर मॉरिशस येथेही मराठी साहित्याचा सुगंध पोहोचवला गेला आहे. या संमेलनांच्या मालिकेत समाजसुधारक, महापुरुष आणि थोर साहित्यकांच्या विचारांना केंद्रस्थानी ठेवून विविध नावांनी संमेलने झाली, ज्यामध्ये प्रामुख्याने खालील संमेलनांचा समावेश आहे:

ऐतिहासिक व वैचारिक धारा: छत्रपती शिवाजी महाराज साहित्य संमेलन, राजमाता जिजाऊ साहित्य संमेलन, छत्रपती संभाजी महाराज साहित्य संमेलन, महात्मा फुले साहित्य संमेलन, सावित्रीबाई फुले साहित्य संमेलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठी साहित्य संमेलन, संत गाडगेबाबा मराठी साहित्य संमेलन.

सांस्कृतिक व प्रादेशिक संमेलने: अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन, युवा साहित्य संमेलन, अखिल भारतीय ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, अखिल भारतीय बेळगाव मराठी साहित्य संमेलन, बालाघाट मराठी साहित्य संमेलन, उत्तर महाराष्ट्र मराठी साहित्य संमेलन, कोकण ग्रामीण मराठी साहित्य संमेलन, परिवर्तन मराठी साहित्य संमेलन.

दिग्गज साहित्यकार व विभूतींच्या स्मृतीप्रित्यर्थ: जनकवी पी. सावळाराम साहित्य संमेलन, नारायण सुर्वे साहित्य संमेलन, सरफोजीराजे साहित्य संमेलन, गदिमा साहित्य संमेलन, शिक्षक साहित्य संमेलन, भागोजीसेठ कीर मराठी साहित्य संमेलन, सयाजीराजे गायकवाड मराठी साहित्य संमेलन, तसेच विविध प्रोत्साहनपर साहित्य संमेलने.

एका युगाची यशस्वी वाटचाल

वडोदरा येथे २५ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या संमेलनाने पूर्ण होणारा हा २०० वा टप्पा म्हणजे मराठी भाषेच्या इतिहासातील एक दीपस्तंभ आहे. डॉ. शरद गोरे यांनी लावलेले साहित्याचे रोपे आज एका महावृक्षात रूपांतरित झाले आहे. त्यांच्या विचारांची स्पष्टता, संघटन कौशल्य आणि मराठी भाषेबद्दलची अपार निष्ठा यामुळेच आज महाराष्ट्राचा सांस्कृतिक मान जागतिक पातळीवर उंचावला असून, डॉ. शरद गोरे यांचे हे नेतृत्व आगामी पिढ्यांसाठी सदैव मार्गदर्शक ठरणारे आहे.

# पिंपळगाव उज्जैनीत उज्जैनी माता मंदिरात नवरात्र उत्सव

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नगर तालुक्यातील पिंपळगाव उज्जैनी येथील प्रसिद्ध श्री. उज्जैनी माता मंदिरात नवरात्र उत्सव मोठ्या भक्तिभावाने आणि उत्साहात साजरा केला जात आहे. नवरात्रोत्सवानिमित्त मंदिरात दर्शनासाठी दररोज मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी होत आहे.



उज्जैनी माता हे मध्य प्रदेशातील उज्जैन येथील श्री हरसिद्धी मातेचे ठाणे असल्याची भाविकांची श्रद्धा आहे. या श्रद्धास्थानाला परिसरातील भाविकांमध्ये विशेष महत्त्व असून, नवरात्रोत्सवाच्या काळात देवीच्या दर्शनासाठी भाविक मोठ्या संख्येने येत आहेत. भक्तिमय वातावरण, देवीचा जयघोष आणि धार्मिक उत्साह यामुळे मंदिर परिसरात उत्सवाचे मंगलमय वातावरण निर्माण झाले आहे.

# बी.पी.एच.ई.एस. च्या आय.एम.एस.सी.डी.आर. येथील एमबीए–२ च्या विद्यार्थ्यांची 'ज्योतीक्रांती सहकारी बँके'स शैक्षणिक भेट




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** बी.पी.एच.ई.एस. च्या आय.एम.एस.सी.डी.आर. () येथील व्यवस्थापन (मॅनेजमेंट) विभागाच्या वतीने एमबीए भाग–२ च्या विद्यार्थ्यांसाठी अहिल्यानगर येथील मार्केट यार्डातील ज्योतीक्रांती सहकारी बँकेत शैक्षणिक भेटीचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांना बँकेच्या प्रत्यक्ष कामकाजाचा अनुभव मिळावा आणि वर्गातील अभ्यासाव्यतिरिक्त बँकिंग प्रक्रियेची सखोल माहिती व्हावी, हा या भेटीमागचा मुख्य उद्देश होता.

**उपक्रमाचा तपशील:**

या भेटीदरम्यान विद्यार्थ्यांना गोल्ड लोन (सुवर्ण कर्ज) प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. यात कर्ज अर्जाच्या मंजुरीपासून ते तारण ठेवलेल्या सोन्याचे मूल्यांकन आणि सुरक्षित ताबा मिळवण्यापर्यंतच्या सर्व टप्प्यांचा समावेश होता.

तसेच, सुवर्ण कर्जासाठी लागणारी आवश्यक कागदपत्रे, कागदपत्रांची पडताळणी आणि नोंदणी प्रक्रियेची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. सर्व कायदेशीर व बँकिंग प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तारण ठेवलेले सोने सुरक्षेच्या दृष्टीने सिक्युरिटी बॅगमध्ये कसे पॅक करून सील केले जाते, याचे प्रात्यक्षिकही विद्यार्थ्यांना दाखवण्यात आले. यामुळे सुवर्ण कर्ज प्रकरणात सुरक्षा, योग्य दस्तऐवजीकरण आणि सुरक्षित अभिरक्षा ( ) यांचे काय महत्त्व असते, हे विद्यार्थ्यांना स्पष्टपणे समजले.

हे माहितीसत्र ज्योतीक्रांती सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी () श्री. किरण वरपे यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सुधीर देओळालीकर आणि कु. अनुराधा मुथा यांनी घेतले. दोन्ही मार्गदर्शकांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या व प्रात्यक्षिकांसह बँकिंग प्रक्रिया समजावून सांगितली आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्या शंकांचे निरसन केले. या शैक्षणिक भेटीदरम्यान प्रा. साक्षी मध्यान आणि प्रा. पूनम तिवारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# 'महिंद्रा'ने बाजारात आणली 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'; ड्रायव्हिंगचा भरपूर आनंद आणि 'महिंद्रा'ची खास ओळख

किंमत ९.९९ लाख रुपयांपासून सुरू । टर्बो इंजिनची ताकद आणि श्रेणीतील सर्वोत्तम टॉर्क : सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारांत ८२ किलोवॅटची शक्ती मिळते. भारतातील सीएनजी प्रवासी गाड्यांमध्ये या गाडीचा २०० एनएम टॉर्क सर्वोत्तम आहे.

वेगवान सुरुवात : सीएनजीवर चालताना ही गाडी अवघ्या ४.९ सेकंदांत ताशी ३० ते ६० किलोमीटरचा वेग गाठते. प्रगत सीएनजी तंत्रज्ञान : या श्रेणीत पहिल्यांदाच १० बार दाबाने सीएनजी इंजेक्शन देणारी यंत्रणा वापरण्यात आली आहे. यामुळे गाडीचा प्रतिसाद चांगला मिळतो आणि इंधनाचा कार्यक्षम वापर होतो.

टर्बो इंजिनमुळे उत्तम मायलेज : ही गाडी प्रति किलो सीएनजीमागे २४.७ किलोमीटरचे प्रमाणित मायलेज देते. त्यामुळे चांगली कामगिरी आणि कमी खर्चात गाडी चालवण्याचा फायदा मिळतो.

जागेचा कल्पक वापर : गाडीच्या तळाशी सीएनजीचे दोन सिलिंडर बसवण्यात आले आहेत. त्यामुळे सामान ठेवण्यासाठी सपाट तळ आणि डिक्कीमध्ये वापरता येण्याजोगी जागा मिळते.

सुरक्षा सुविधांचा समावेश : या गाडीची रचना ५-स्टार सुरक्षा मानांकनाच्या दृष्टीने करण्यात आली आहे. सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल (ईएससी), 'आयएसओफिक्स' आणि 'सीएनजी'साठीच्या विशेष सुरक्षा सुविधांसह ३५ हून अधिक सुविधा सर्व प्रकारांत देण्यात आल्या आहेत.

मुंबई, ऑक्टोबर २०२६ : भारतातील आघाडीची एसयूव्ही उत्पादक कंपनी महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड हिने 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी' ही आपली पहिली सर्वसामान्य ग्राहकांसाठीची सीएनजी प्रवासी कार बाजारात आणली आहे. या गाडीची सुरुवातीची किंमत ९.९९ लाख रुपये (एक्स-शोरूम) आहे.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मुळे सीएनजी गाड्यांमधूनही वेगवान आणि उत्साही ड्रायव्हिंगचा अनुभव घेता येतो, हे दिसून येईल. या गाडीत टर्बोचार्ज्ड इंजिन आहे. सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारच्या इंधनांवर हे इंजिन ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. ही गाडी प्रति किलो सीएनजीमध्ये २४.७ किलोमीटरचे प्रमाणित मायलेज देते. त्यामुळे ड्रायव्हिंगचा आनंद कायम ठेवून इंधनावरील खर्च कमी करण्याचा पर्याय ग्राहकांना मिळतो. 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मध्ये केवळ सीएनजीची बचतच नाही, तर टर्बो चार्ज्ड इंजिनची कामगिरी, आकर्षक डिझाइन, प्रशस्त जागा, आधुनिक तंत्रज्ञान, आरामदायी प्रवास आणि सुरक्षितता यांचाही समावेश आहे. आकर्षक किमतीत उपलब्ध असलेली ही गाडी सीएनजी एसयूव्ही घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी एक चांगला पर्याय आहे.

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मुळे एसयूव्ही खरेदी करणे अधिक ग्राहकांना शक्य होणार आहे. विशेषतः पहिल्यांदाच एसयूव्ही घेऊ इच्छिणाऱ्या आणि अधिक शक्तिशाली इंजिन व आधुनिक सुविधांची अपेक्षा असलेल्या ग्राहकांसाठी ही गाडी चांगला पर्याय आहे. या गाडीच्या सुरुवातीच्या प्रकारातही २६.०३ सेंटीमीटरची एचडी टचस्क्रीन, क्रूझ कंट्रोल, मागील सीटसाठी एसी व्हेंट्स आणि ६०:४० प्रमाणात विभागता येणारी मागील सीट अशा प्रीमियम सुविधा आहेत. साहजिकच, सीएनजीमुळे इंधनावरील खर्च कमी होतोच, शिवाय 'एक्सयूव्ही ३एक्सओ'ची खास रचना, आधुनिक तंत्रज्ञान आणि दैनंदिन वापरातील सोयीही अनुभवता येतात. ड्रायव्हिंगच्या आनंदात कोणतीही तडजोड करावी लागत नाही.




'महिंद्रा अँड महिंद्रा लिमिटेड'च्या ऑटोमोटिव्ह व्यवसायाचे अध्यक्ष डॉ. वेलुसामी आर. म्हणाले, "'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'चे वैशिष्ट्य म्हणजे कोणतीही तडजोड न करता उत्तम अनुभव देणे. आजच्या ग्राहकांना 'एसयूव्ही'मधील प्रशस्त जागा, आधुनिक तंत्रज्ञान, सुरक्षितता आणि उत्तम ड्रायव्हिंगचा अनुभव हवा असतो. त्याच वेळी सीएनजीमुळे इंधनावरील खर्चही कमी व्हावा, अशी त्यांची अपेक्षा असते. या गाडीत तिच्या श्रेणीतील सर्वोत्तम टॉर्क, टर्बोचार्ज्ड इंजिनची कामगिरी आणि प्रभावी मायलेज यांचा संगम आहे. त्यामुळे 'सीएनजी'ची किफायतशीरता आणि एसयूव्ही चालवण्याचा आनंद या दोन्ही गोष्टी एकाच गाडीत मिळतात. 'सीएनजी एसयूव्ही'कडून ग्राहकांच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी ही गाडी नवा मापदंड ठरवेल."

मुख्य वैशिष्ट्ये

टर्बो इंजिनची दमदार कामगिरी व ड्रायव्हिंगचा उत्साह सीएनजी व पेट्रोल, दोन्ही प्रकारांत

कामगिरीत कोणतीही तडजोड नाही : १.२ लिटरचे एमस्टॅलियन टीसीएमपीएफआय टर्बोचार्ज्ड इंजिन हे सीएनजी आणि पेट्रोल या दोन्ही प्रकारांत ८२ किलोवॅट शक्ती आणि २०० एनएम टॉर्क देते. टर्बोचार्जरची कार्यपद्धती आणि इंजिनचे इलेक्ट्रॉनिक नियंत्रण यंत्रणा (ईसीयू) यांची योग्य जुळवणी केल्यामुळे इंधनाचा प्रकार कोणताही असला, तरी इंजिनची शक्ती आणि टॉर्क समान राहतात. त्यामुळे प्रत्येक प्रवासात एक्सयूव्ही ३एक्सओची दमदार कामगिरी आणि ड्रायव्हिंगचा आनंद अनुभवता येतो.

या श्रेणीतील सर्वाधिक टॉर्क : भारतातील सीएनजी प्रवासी गाड्यांमध्ये 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'चा २०० एनएम टॉर्क सर्वोत्तम आहे. १,५०० ते ३,५०० आरपीएम या इंजिनच्या वेगमर्यादेतही हा टॉर्क उपलब्ध होतो. त्यामुळे गाडी वेगाने पुढे जाते. शहरातील रस्त्यांवर तसेच महामार्गावरही गाडी चालवणे सहज आणि आत्मविश्वासपूर्ण होते.

वेगाने पकडते गती : सीएनजीवर चालताना 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'ला ताशी ० ते ६० किलोमीटर वेग गाठण्यासाठी ४.९ सेकंद, तर ताशी ० ते १०० किलोमीटर वेग गाठण्यासाठी ११.८ सेकंद लागतात.

अधिक अंतर कापा, ड्रायव्हिंगचा आनंद घ्या.

मायलेज आणि कामगिरी यांचा उत्तम मेळ : या गाडीचे प्रमाणित मायलेज प्रति किलो सीएनजीमागे २४.७ किलोमीटर इतके आहे. त्यामुळे इंधनावरील खर्च कमी होतो. त्याच वेळी, एक्सयूव्ही ३एक्सओकडून अपेक्षित असलेली टर्बो इंजिनची दमदार कामगिरीही अनुभवता येते.

सीएनजी आणि पेट्रोलचा सहज वापर : चालकाला सीएनजी किंवा पेट्रोल यांपैकी कोणत्याही इंधनावर गाडी चालवता येते. सीएनजी कमी झाल्यास गाडी आपोआप पेट्रोलवर चालू लागते. त्यामुळे प्रवासात खंड पडत नाही आणि ड्रायव्हिंगचा आनंद कायम राहतो.

वापरातील सोयी लक्षात घेऊन केलेली रचना : गाडीच्या डिस्प्लेवर सरासरी आणि त्या क्षणाचे मायलेज दिसते. त्यामुळे इंधनाचा वापर किती होत आहे, याची माहिती तत्काळ मिळते. एनजीव्ही फास्ट-फिलिंग व्हॉल्व्हमुळे सीएनजी भरण्यास कमी वेळ लागतो आणि ही प्रक्रिया अधिक सोयीस्कर होते. त्यामुळे ड्रायव्हिंगचा आनंद घेण्यासाठी अधिक वेळ मिळतो.

स्मार्ट रचना. प्रीमियम लूक. प्रत्येक गोष्टीत झिंग!

जागेचा कल्पक वापर : सीएनजीच्या दोन सिलिंडरची रचना सामान ठेवण्याच्या जागेखाली केली आहे. त्यामुळे सामान ठेवण्यासाठी सपाट तळ कायम राहतो आणि डिक्कीमध्ये २७० लिटर वापरता येण्याजोगी जागा मिळते. अतिरिक्त चाक गाडीच्या तळाशी बसवलेले आहे.

प्रीमियम एसयूव्हीचा आकर्षक लूक : 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'मध्ये अनेक खास सुविधा आहेत. यात २६.०३ सेंटीमीटरच्या दोन स्क्रीन, स्कायरूफ, 'डॉल्बी ॲटमॉस'चे प्रभावी ध्वनितंत्रज्ञान, काळ्या रंगाच्या लेदरसदृश सीट्स, गाडीच्या रंगातील किंवा गनमेटल ग्रे रंगातील आकर्षक ग्रिल, दोन रंगांचे स्टायलिश छत आणि काळ्या रंगाची आर१६ अलॉय व्हील्स यांचा समावेश आहे.

झिंगचा आनंद कायम ठेवत, सुरक्षेशी कोणतीही तडजोड नाही

सर्व प्रकारांत सहा एअरबॅग्ज : 'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'च्या प्रत्येक प्रकारात सहा एअरबॅग्ज, इलेक्ट्रॉनिक स्टॅबिलिटी कंट्रोल आणि लहान मुलांच्या सीटसाठी आयएसओफिक्स माउंट्स देण्यात आले आहेत.

सुरक्षेसाठी तत्पर यंत्रणा : गॅस गळती ओळखणारी यंत्रणा गळती झाल्यास ती लगेच ओळखते. त्यानंतर गाडी आपोआप पेट्रोलवर चालण्याच्या मोडमध्ये जाते.

५-स्टार सुरक्षा मानांकनासाठी तयार : एक्सयूव्ही ३एक्सओच्या आधीच्या मॉडेलला 'भारत एनसीएपी'च्या 'प्रौढ प्रवासी सुरक्षा' आणि 'बाल प्रवासी सुरक्षा' या दोन्ही चाचण्यांमध्ये ५-स्टार मानांकन मिळाले आहे. त्याच मॉडेलच्या आधारावर एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी तयार करण्यात आली आहे.

'एक्सयूव्ही ३एक्सओ'विषयी :

'महिंद्रा'च्या सर्वाधिक यशस्वी एसयूव्हींपैकी 'एक्सयूव्ही ३एक्सओ' ही एक आहे. अवघ्या अडीच वर्षांपेक्षा कमी काळात या गाडीची एकूण विक्री २.५ लाखांहून अधिक झाली आहे. कॉम्पॅक्ट एसयूव्हीच्या श्रेणीत या गाडीने नवा मापदंड निर्माण केला आहे. आकर्षक डिझाइन, दमदार कामगिरी, प्रगत सुरक्षा व्यवस्था, प्रीमियम इंटिरिअर आणि या श्रेणीतील सर्वोत्तम तंत्रज्ञान यांचा मेळ या गाडीत आहे. 'महिंद्राच्या एसयूव्ही'च्या परंपरेतून तयार झालेली एक्सयूव्ही ३एक्सओ ग्राहकांना गाडी चालवण्याचा आनंददायी अनुभव देते. या श्रेणीतील अनेक वैशिष्ट्ये आणि किमतीच्या तुलनेत अधिक फायदे यामुळे आधुनिक एसयूव्ही खरेदीदारांची ती पसंती ठरली आहे.

टेस्ट ड्राइव्ह, बुकिंग आणि गाडीची डिलिव्हरी

'एक्सयूव्ही ३एक्सओ झेडएनजी'ची टेस्ट ड्राइव्ह १५ ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल. या गाडीचे बुकिंग २० ऑक्टोबर २०२६ पासून अधिकृत डीलरकडे आणि .. या संकेतस्थळावर करता येईल. गाड्यांची डिलिव्हरीही २० ऑक्टोबर २०२६ पासून सुरू होईल.

गाडीच्या प्रकारानुसार किंमत (लाख रुपयांत)

सर्व किंमती एक्स-शोरूम आहेत.

# 'चांगला माणूस बना, जिद्द आणि चिकाटीने यश मिळवा'– बाबासाहेब बोडखे

**शहरातील श्री मार्कंडेय पतसंस्थेत गुणवंतांचा गौरव; विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, जिद्द आणि उद्योजकतेचे मार्गदर्शन | बाबासाहेब बोडखे, सुरेशराव चव्हाण यांचा विशेष गौरव**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित आणि श्री मार्कंडेय अभ्यासिका व ग्रंथालयाच्या वतीने समाजात उल्लेखनीय कार्य करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला. संस्थेच्या मुख्य कार्यालयात आयोजित या सोहळ्यात अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या चेअरमनपदी नियुक्ती झाल्याबद्दल मुख्याध्यापक बाबासाहेब बोडखे यांचा सत्कार करण्यात आला. तसेच, शून्यातून विश्व निर्माण करणारे व्यावसायिक सुरेशराव चव्हाण यांना जीवनगौरव पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमातून शैक्षणिक प्रगती, उद्योजकता, सामाजिक बांधिलकी आणि समाजाच्या सर्वांगीण विकासाचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून बापूसाहेब उत्तेकर आणि स्थानिक नगरसेवक निखिल वारे उपस्थित होते. सत्कार समारंभाच्या निमित्ताने मान्यवरांनी आपापल्या जीवनातील अनुभव कथन करून विद्यार्थ्यांना यशस्वी जीवनासाठी प्रेरित केले.

सत्काराला उत्तर देताना बाबासाहेब बोडके यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी, जिद्द, चिकाटी आणि जीवनातील ध्येयपूर्ती याविषयी मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या युगात यश मिळवण्यासाठी अभ्यासातील सातत्य, योग्य नियोजन, वेळेचे व्यवस्थापन आणि आत्मविश्वास आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. जीवनात केवळ मोठे पद मिळवणे महत्त्वाचे नसून, एक चांगला माणूस म्हणून समाजात वावरणे आणि सामाजिक बांधिलकी जपणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून स्पष्ट केले.

विद्यार्थ्यांनी स्वतःचे ध्येय निश्चित करून त्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. अपयश आले तरी निराश न होता त्यातून शिकून पुढे जाण्याची वृत्ती जोपासावी, असा संदेश त्यांनी दिला. श्री मार्कंडेय नागरी सहकारी पतसंस्था केवळ आर्थिक व्यवहारांपुरती मर्यादित न राहता अभ्यासिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि प्रेरणादायी व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे. संस्थेचे हे कार्य संपूर्ण समाजासाठी दिशादर्शक आणि कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गारही बोडखे यांनी काढले.

जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित सुरेशराव चव्हाण यांनी आपल्या मनोगतातून तरुणांना उद्योजकतेचे महत्त्व पटवून दिले. व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मेहनत, सातत्य, प्रामाणिकपणा, ग्राहकांशी विश्वासाचे नाते आणि बदलत्या काळानुसार आवश्यक कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. शून्यातून स्वतःचे विश्व निर्माण करताना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. मात्र, संकटांना न घाबरता आत्मविश्वासाने वाटचाल केल्यास यशाचा मार्ग निश्चितपणे सापडतो, असे त्यांनी स्पष्ट केले. तरुणांनी नोकरीच्या संधी शोधण्याबरोबरच स्वतःचा व्यवसाय उभारण्याच्या दिशेनेही विचार करावा, असे आवाहन त्यांनी केले.

समाजातील तळागाळातील घटकांना आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या प्रवाहात आणण्यासाठी श्री मार्कंडेय पतसंस्था करीत असलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. संस्थेच्या माध्यमातून समाजातील सर्वसामान्य नागरिकांना आधार मिळत असून, अशा उपक्रमांचे अनुकरण इतर संस्थांनीही करावे, असे मत चव्हाण यांनी व्यक्त केले.

नगरसेवक निखिल वारे यांनी आपल्या मनोगतात पद्मशाली समाजाच्या कष्टकरी आणि प्रामाणिक परंपरेचा गौरव केला. अहिल्यानगर शहरात पद्मशाली समाजाने अनेक वर्षांपासून आपल्या मेहनतीच्या जोरावर वेगळी ओळख निर्माण केली आहे. या समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत असलेली श्री मार्कंडेय पतसंस्था शहरासाठी अभिमानाची बाब आहे, असे त्यांनी सांगितले. विशेषतः तळागाळातील नागरिक आणि गोरगरीब विडी कामगारांसाठी श्री मार्कंडेय पतसंस्था कल्पवृक्षाप्रमाणे आधार देणारी ठरत आहे. सर्वसामान्यांच्या आर्थिक गरजा लक्षात घेऊन त्यांना सहकार्य करणे, तसेच शैक्षणिक उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना प्रगतीची संधी उपलब्ध करून देणे, हे संस्थेचे कार्य कौतुकास्पद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जिल्हा रुग्णालयात काशिनाथ जगताप दाम्पत्याचा नेत्रदान, अवयवदान व देहदानाचा संकल्प

**मृत्यूनंतरही इतरांच्या जीवनात प्रकाश पेरण्याचा संकल्प | नातेवाइकांच्या दशक्रियाविधीप्रसंगी मनातील विचारांना दिले मुर्तस्वरूप**



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मृत्यूनंतरही आपले शरीर समाजाच्या उपयोगी पडावे, आपल्या अवयवांमुळे गरजू व्यक्तींना नवजीवन मिळावे आणि देहदानातून वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन व शिक्षणाला हातभार लागावा, या उदात्त भावनेतून शिरूर येथील काशिनाथ जगताप यांनी नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाचा अहिल्यानगरच्या जिल्हा रुग्णालयात संकल्प अर्जाने केला. विशेष म्हणजे, या सामाजिक जाणीवेतून त्यांनी स्वतःसोबत आपल्या पत्नीलाही या संकल्पात सहभागी करून घेतले. जगताप दाम्पत्याच्या या निर्णयातून सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता आणि माणुसकीचे दर्शन घडविले.

शुक्रवारी (दि. १६ ऑक्टोबर) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे हा संकल्प नोंदविण्यात आला. काशिनाथ जगताप हे नातेवाइकांच्या दशक्रियाविधीसाठी शिरूर येथून अहिल्यानगर येथे आले होते. यावेळी मानवी जीवन, मृत्यू आणि मृत्यूनंतरही समाजासाठी काहीतरी करण्याची संधी या विचारांनी त्यांच्या मनात घर केले. मृत्यूनंतर शरीराचा उपयोग वैद्यकीय सेवेसाठी होऊ शकतो, तसेच अवयवदानामुळे अनेक गरजू रुग्णांना नवजीवन मिळण्याची संधी निर्माण होऊ शकते, ही जाणीव त्यांना झाली. या विचारातून त्यांनी नेत्रदान, अवयवदान आणि देहदान करण्याचा निर्णय घेतला.

मनात आलेला हा विचार केवळ विचारांपुरता मर्यादित न ठेवता त्यांनी तातडीने कृतीत आणला. श्याम पारेकर यांच्यासोबत ते अहिल्यानगर येथील जिल्हा रुग्णालयात पोहोचले. तेथील नेत्र विभागात त्यांनी नेत्रदान, अवयवदान आणि देहदानासंदर्भात सविस्तर माहिती घेतली. या प्रक्रियेबाबत त्यांच्या मनात असलेल्या विविध शंकांचे निरसन करण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यांनी त्यांना संकल्प नोंदणीची प्रक्रिया समजावून सांगितली.

जिल्हा रुग्णालयातील वैद्यकीय पथकाकडून मिळालेल्या माहितीमुळे जगताप यांना या संकल्पाचे महत्त्व अधिक स्पष्ट झाले. त्यानंतर त्यांनी भ्रमणध्वनीद्वारे आपल्या पत्नीलाही या उपक्रमाची माहिती दिली. समाजोपयोगी कार्यात सहभागी होण्याच्या या निर्णयाला पत्नीनेही सकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर जगताप दाम्पत्याने नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाचे ऑनलाइन संकल्प अर्ज भरून दिले. नेत्रदान, अवयवदान आणि देहदानासाठीची प्रक्रिया सोपी व सुलभ असल्याचे अनुभवातून लक्षात आल्यानंतर जगताप यांनी समाधान व्यक्त केले. तसेच यासाठी मार्गदर्शन करणाऱ्या जिल्हा रुग्णालयातील संपूर्ण पथकाचे त्यांनी आभार मानले.

किशिनाथ जगताप यांनी नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाचा संकल्प केल्याबद्दल जिल्हा रुग्णालयाच्या वतीने त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुचेता यादव, प्रशासकीय अधिकारी डॉ. प्रविण बोठे, असंसर्गजन्य रोग विभागाचे प्रमुख डॉ. अरुण सोनवणे आणि नेत्र विभागातील सतीश आहिरे उपस्थित होते.

मानवी जीवन अनमोल आहे. मात्र, मृत्यूनंतरही आपल्या शरीराच्या माध्यमातून दुसऱ्या व्यक्तीच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करता येऊ शकतो. नेत्रदानामुळे दृष्टी मिळविण्याची संधी निर्माण होऊ शकते, अवयवदानामुळे पात्र रुग्णांचे प्राण वाचविण्यास मदत होऊ शकते, तर देहदान वैद्यकीय शिक्षण व संशोधनासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकते. याच सामाजिक जाणीवेतून जगताप दाम्पत्याने घेतलेला निर्णय इतरांसाठीही प्रेरणादायी ठरणारा आहे. नेत्रदान, अवयवदान आणि देहदानाविषयी समाजात जागरूकता निर्माण होणे आवश्यक आहे. या विषयांबाबत असलेले गैरसमज दूर करून अधिकाधिक नागरिकांनी या सामाजिक कार्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी अपेक्षा अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुचेता यादव यांनी व्यक्त केली.

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेत एम.जे. एस.कॉलेजच्या सुरेखा मातनेची निवड

**दैनिक आकर्षण | केशव कातोरे**



**बेलवंडी–** दि. १० ऑक्टोबर २०२६ रोजी नाशिक येथे झालेल्या सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आंतर विभागीय क्रॉसकंट्री स्पर्धेत महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयाची खेळाडू मातने सुरेखा हिने प्राविण्य प्राप्त करून तिची मंगलोर येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ क्रॉसकंट्री स्पर्धेसाठी निवड झाली आहे. घरची परिस्थिती खडतर.. पैशाअभावी शिक्षण थांबणार होते.. अशा परिस्थितीत मराठवाड्यातील ऊस तोडणी मजुराची मुलगी सुरेखा मातने हिने शिक्षणासाठी कष्ट आणि संघर्ष करण्याची तयारी दाखवली आणि खेळाच्या मैदानावर उतरली. या महाविद्यालयामध्ये गेल्या तीन वर्षांपासून खेळणारी सुरेखा ही श्रीगोंद्या एक्सप्रेस म्हणून ओळखली जाते.

'सुरेखाचा रनिंगचा ध्यास व महाविद्यालयाची मिळणारी भक्कम साथ' या जोरावर सुरेखा अनेक मॅरेथॉन व क्रॉसकंट्री स्पर्धा जिंकून यशाचे शिखर गाठत आहे. तिच्या या यशाबद्दल महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन माजी मंत्री बबनराव पाचपुते, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य बाबासाहेब भोस, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य माजी आमदार राहुल जगताप, महावीर पटवा, प्राचार्य प्रो.डॉ. प्रकाश साळवे, उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, उपप्राचार्य व जिमखाना विभाग प्रमुख डॉ.नितीन थोरात, ज्युनिअर कॉलेजचे उपप्राचार्य प्रा.श्रीकांत थोरात, पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झिटे व सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सुरेखाला शारीरिक शिक्षण संचालक प्रा.कल्पना बागुल व क्रीडा शिक्षक संजय डफळ यांचे मार्गदर्शन लाभले.

# कांबीच्या लेकीला ग्रामस्थांकडून भावपूर्ण श्रद्धांजली

**ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या स्मृतींना उजाळा; कांबी गावात शोकभावना व्यक्त**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शेवगाव–** मराठी चित्रपटसृष्टी आणि लोककलेच्या क्षेत्रात आपल्या अभिनयाचा अमीट ठसा उमटविणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांना त्यांच्या मूळ गावाशी नाळ जोडलेल्या कांबी येथे ग्रामस्थांच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी गावातील विविध क्षेत्रांतील नागरिकांनी त्यांच्या आठवणींना उजाळा देत भावना व्यक्त केल्या.

मधू कांबीकर यांनी आपल्या अभिनयकौशल्याच्या जोरावर मराठी कलाविश्वात स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. ग्रामीण जीवनाचा गंध, लोककलेची परंपरा आणि लावणीच्या कलेशी असलेली निष्ठा यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व रसिकांच्या मनात कायमचे कोरले गेले. 'शापित' चित्रपटातील 'बिजली' या भूमिकेसह विविध चित्रपटांतील त्यांच्या अभिनयाने प्रेक्षकांच्या मनावर छाप पाडली.





कांबी गावाशी असलेले त्यांचे नाते ग्रामस्थांसाठी अभिमानाची बाब होती. त्यांच्या निधनाने मराठी कलाक्षेत्राची मोठी हानी झाल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. त्यांच्या कलाप्रवासाचे स्मरण करताना लोककलेच्या जतन-संवर्धनासाठी त्यांनी दिलेल्या योगदानाचाही गौरव करण्यात आला. श्रद्धांजली कार्यक्रमात मधू कांबीकर यांच्या प्रतिमेस अभिवादन करून उपस्थितांनी आदरांजली वाहिली. यावेळी पंचायत समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कांबीच्या मातीतून कलाविश्वात झेप घेणाऱ्या या लेकीच्या आठवणींनी यावेळी उपस्थितांचे मन भरून आले. त्यांच्या कलेचा वारसा आणि लोककलेप्रती असलेली निष्ठा नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

# शेवगावच्या मातीत रुजलेली कला आता रुपेरी पडद्यावर; 'धप्पा'मधून ग्रामीण कलावंतांच्या स्वप्नांना मिळाली झळाळी



**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**शेवगाव–** कला, साहित्य आणि संस्कृतीचा ऐतिहासिक वारसा लाभलेल्या शेवगावच्या मातीतून अनेक कलावंतांनी आपल्या कलेचा प्रवास सुरू केला. प्राथमिक शाळेपासूनच कलेचे संस्कार, बाळासाहेब भारदे हायस्कूल आणि ओपन थिएटरच्या माध्यमातून मिळालेली रंगभूमीची ओळख यामुळे शेवगावच्या कलाकारांच्या कलाप्रवासाला सातत्याने बळ मिळत गेले. संघर्ष कितीही मोठा असला तरी कलेशी नाते कायम ठेवण्याची जिद्द हीच या भूमीची ओळख बनली आहे.

याच परंपरेचा वारसा पुढे नेत शेवगावच्या कलाकारांचा प्रवास आता रुपेरी पडद्यापर्यंत पोहोचला आहे. येत्या ९ ऑक्टोबर रोजी 'धप्पा' हा चित्रपट महाराष्ट्रात प्रदर्शित होत असून, या चित्रपटाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलाकारांच्या कलास्वप्नांना नवे व्यासपीठ मिळणार आहे.

शेवगावचे कलाकार व रंगभूमीशी निगडित ज्येष्ठ श्याम मोहिते, प्रा. मफीज इनामदार, भाऊ काळे, अजय केदार, हाय्युम शेख यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद या प्रवासासाठी प्रेरणादायी ठरले. चि. चैतन्य विरेंद्र बैरागी या बालकलाकाराने शॉर्ट फिल्मच्या माध्यमातून रुपेरी पडद्यावर प्रवेश केला आहे. तर श्री. कृष्णा जवरे यांनी 'धप्पा' चित्रपटात सहाय्यक दिग्दर्शकासह विविध जबाबदाऱ्या सांभाळत शेवगावच्या कलाकारांना चित्रपटसृष्टीशी जोडणारा महत्त्वाचा दुवा निर्माण केला.

ग्रामीण मातीतून उगवलेल्या या कलावंतांना रसिकांचे प्रेम, आशीर्वाद आणि प्रोत्साहन मिळावे, अशी अपेक्षा इन्सानियत फाउंडेशन, शेवगावच्या मित्र परिवाराने व्यक्त केली आहे. 'धप्पा'च्या संपूर्ण टीमला चित्रपटाच्या यशासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# श्री दुर्गा सप्तशती पाठाच्या मंत्रोच्चाराने परिसर भक्तिमय

**वृंदावन कॉलनी महिला केंद्राच्या वतीने धार्मिक सोहळ्याचे आयोजन | श्री तुळजाभवानी मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती**

**दैनिक आकर्षण | प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शारदीय नवरात्रोत्सव हा देवीच्या उपासनेचा आणि शक्तीच्या आराधनेचा महत्त्वपूर्ण उत्सव मानला जातो. नवरात्रातील प्रत्येक दिवसाला धार्मिक महत्त्व असून, या काळात देवीची आराधना, नामस्मरण आणि विविध धार्मिक विधी मोठ्या श्रद्धेने केले जातात. याच पार्श्वभूमीवर पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी मंदिरात वृंदावन कॉलनी महिला केंद्राच्या वतीने श्री दुर्गा सप्तशती पाठाचे आयोजन करण्यात आले. मंत्रोच्चार, देवीच्या नामाचा गजर आणि धार्मिक विधींमुळे मंदिर परिसरात भक्तिमय व मंगलमय वातावरण निर्माण झाले होते.

या धार्मिक सोहळ्यात महिला भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत श्रद्धेने देवीचे नामस्मरण केले आणि देवीचा आशीर्वाद घेतला. नवरात्रोत्सवाच्या उत्साहात या धार्मिक कार्यक्रमामुळे आणखी भर



पडली. पूजा-विधी आणि श्री दुर्गा सप्तशती पाठाच्या पठणाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

**दुर्गा सप्तशती पाठाचे धार्मिक महत्त्व**

श्री दुर्गा सप्तशती या ग्रंथात एकूण १३ अध्याय आणि ७०० श्लोक आहेत. या ग्रंथाला 'देवी महात्म्य' आणि 'चंडीपाठ' असेही म्हटले जाते. यामध्ये महाकाली, महालक्ष्मी आणि महासरस्वती या देवीच्या स्वरूपांचे वर्णन करण्यात आले आहे. धार्मिक श्रद्धेनुसार, दुर्गा सप्तशती पाठ केल्याने मानसिक शांती आणि आत्मविश्वास मिळण्यास मदत होते, तसेच संकटांचा सामना करण्याचे बळ प्राप्त होते, अशी भाविकांची धारणा आहे.

**स्त्रीशक्ती आणि सत्प्रवृत्तीच्या विजयाचा संदेश**

दुर्गा सप्तशती पाठातून स्त्रीशक्तीचे महत्त्व, धर्माचा विजय आणि वाईट प्रवृत्तींवर चांगल्या प्रवृत्तींच्या विजयाचा संदेश दिला जातो. घरात सुख-समृद्धी नांदावी, सकारात्मक वातावरण निर्माण व्हावे आणि सर्वांना देवीचा आशीर्वाद लाभावा, यासाठी या पाठाच्या माध्यमातून प्रार्थना केली जाते. नवरात्रोत्सवाच्या नऊ दिवसांत देवीची आराधना आणि दुर्गा सप्तशती पाठाला विशेष महत्त्व दिले जाते. पाईपलाईन रोड येथील श्री तुळजाभवानी मंदिरात वृंदावन कॉलनी महिला केंद्राच्या वतीने हा पाठ उत्साहपूर्ण आणि मंगलमय धार्मिक वातावरणात संपन्न झाला. यावेळी महिला भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

(पान १ वरून)

## मुळा धरणावरील वारंवार खंडित होणारा वीजपुरवठा सुरळीत करा!

जात आहे. महापालिकेने वीजपुरवठ्याच्या समस्येबाबत महावितरण कार्यालयाशी वारंवार पत्रव्यवहार करूनही वारंवार वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार सुरूच असल्याचे बैठकीत निदर्शनास आणून देण्यात आले.

भूमिगत वीजवाहिन्या किंवा १३२ केव्ही वाहिनीद्वारे जोडणीचा पर्याय महावितरण कार्यालयाचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण यांनी सांगितले की, मुळा धरण परिसरातील वीजपुरवठा वारंवार खंडित होण्याची समस्या कायमस्वरूपी सोडविण्यासाठी भूमिगत वीजवाहिन्या टाकून वीजपुरवठा करावा लागेल किंवा राहुरी परिसरातून १३२ केव्ही वीजवाहिनीवरून जोडणी घ्यावी लागेल. यासाठी राज्य शासनाकडे पाठपुरावा करणे आवश्यक आहे. वीजपुरवठा खंडित होऊ नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येतील, असे आश्वासन त्यांनी दिले.

केडगावचा पाणीपुरवठा दोन ते तीन दिवसांनी करण्याची मागणी नगरसेवक तथा स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर यांनी केडगाव परिसरातील पाणीपुरवठ्याच्या समस्येकडे लक्ष वेधले. केडगावला पाच ते सहा दिवसांनी पाणी मिळत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. केडगाव परिसराकडे नेहमीच दुर्लक्ष केले जात असल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. त्यामुळे या भागाचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करून दोन ते तीन दिवसांनी पाणी उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

वीजपुरवठा आणि पाणीपुरवठ्याच्या प्रश्नावर वारंवार बैठका होऊनही अद्याप कायमस्वरूपी तोडगा निघालेला नाही. त्यामुळे हा प्रश्न तातडीने मार्गी न लागल्यास नगरसेवक कार्यालयावर मोठा मोर्चा काढण्यात येईल, तसेच यापुढे तीव्र आंदोलन केले जाईल, असा इशाराही नगरसेवक अविनाश घुले व प्रकाश भागानगरे यांनी दिला.

भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी महावितरण प्रशासनाने मुळा धरण येथे सबस्टेशन उभारण्यासाठी तसेच १३२ केव्ही वीजवाहिनीवरून जोडणी घेण्यासाठी नवीन प्रस्ताव तयार करून राज्य शासनाकडे पाठवावा, अशी मागणी केली. हा प्रस्ताव मार्गी लागण्यासाठी आपण पाठपुरावा करू, असेही त्यांनी सांगितले.

या बैठकीला महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सभापती दिपालीताई बारस्कर, उपसभापती वर्षाताई सानप, उपायुक्त मेहर लहारे, महावितरणचे कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, स्थायी समितीचे माजी सभापती मनोज कोतकर, अविनाश घुले, नगरसेवक प्रकाश भागानगरे, पुष्कर कुलकर्णी, पाणीपुरवठा अधिकारी गणेश गाडळकर, महादेव काकडे यांच्यासह विविध अधिकारी उपस्थित होते.

## अहिल्यानगर शहरात 'जागर नारी शक्तीचा' दांडिया नाईटचे आयोजन

माहिती दिली जाणार आहे. अहिल्यानगर शहराला अधिक हरित, स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त बनवण्यासाठी उपस्थित सर्व महिलांना पर्यावरण संवर्धनाची सामूहिक शपथ दिली जाईल. या विशेष सोहळ्यास आमदार संग्राम भैय्या जगताप, रणरागिणी मंडळाच्या अध्यक्षा सौ. धनश्रीताई विखे पाटील तसेच भारतीय जनता पक्षाचे सर्व प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

महिलांसाठी मोफत प्रवेश, आकर्षक सोयी आणि भव्य पारितोषिके

महिलांसाठी पूर्णपणे मोफत प्रवेश असलेल्या या दांडिया नाईटमध्ये आकर्षक डान्स फ्लोअर, उत्कृष्ट गरबा परफॉर्मन्स आणि खाद्यपदार्थांचे विविध स्टॉल्स असणार आहेत. याशिवाय गरब्यामध्ये उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या व सजलेल्या महिलांसाठी बेस्ट ग्रुप, बेस्ट दांडिया क्वीन आणि बेस्ट कॉस्ट्युम अशी आकर्षक पारितोषिके देऊन त्यांना सन्मानित केले जाणार आहे. सोमनाथ जाधव, दिनेश फिरके व सहकाऱ्यांच्या संयोजनाखाली पार पडणाऱ्या या भव्य सोहळ्यास अहिल्यानगर शहरातील सर्व महिला भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## नवनागापूर पाणीप्रश्नाला आ. दातेंच्या पाठपुराव्याने गती

यांच्याकडेही निवेदनाद्वारे मागणी केली होती.

गावाच्या पाणीप्रश्नाची दखल घेत आमदार दाते सर यांनी संबंधित स्तरावर पाठपुरावा केल्याने या कामाला पुढे नेण्यासाठी मदत झाली. पाणीपुरवठा व्यवस्था सक्षम होण्याच्या दृष्टीने हे काम महत्त्वपूर्ण ठरणार असून, ग्रामस्थांना त्याचा लाभ मिळण्याची अपेक्षा आहे. गावाच्या मूलभूत गरजांपैकी पाणी हा अत्यंत महत्त्वाचा विषय असल्याने या कामासाठी सहकार्य केल्याबद्दल ग्रामस्थांनी आमदार दाते सरांचे आभार व्यक्त केले. यावेळी दिलीप दादा दाते, प्रशांत दादा गायकवाड, अप्पासाहेब सप्रे, राहुल सप्रे, संजय भोर, श्रीकांत पवार, रामदास अडसूरे, रत्नकांत दरेकर, शंकर पवार, केतन तारडे, संकेत तागडकर, बजरंग काळे आणि प्रदोष सांगळे यांच्यासह अनेक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देऊन पाणीपुरवठ्यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर सातत्याने पाठपुरावा करण्याची भूमिका आमदार काशिनाथ दाते सर यांच्या कार्यातून अधोरेखित होत आहे. नवनागापूरच्या पाणीप्रश्नाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे ठरणार असल्याने ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले.